# मूत्र संस्थेचा संसर्ग

## मूत्र संस्थेचा संसर्ग म्हणजे काय?

मूत्र मार्गात जीवाणू वाढल्यामुळे तेथे संसर्ग होतो. सर्वसाधारणपणे मूत्र मार्गात शिरलेले जीवाणू मूत्र विसर्जन करतांना बाहेर टाकले जातात, परंतू जर जीवाणू मूत्रमार्गात राहीले तर तेथे बाधा उत्पन्न करतात. मूत्र मार्गात मूत्र पिंड, मूत्र वाहिन्या, मूत्राशय आणि मूत्र नलिका या अवयवांचा समावेश आहे . मूत्र पिंडात मूत्र तयार होते आणि ते मूत्र वाहिनी मार्फत मूत्राशयात वाहून नेले जाते . मूत्राशयातील मूत्र मूत्रनलिकेद्वारा शरीराबाहेर टाकले जाते. मूत्र मार्गातील संसर्ग हा मूत्रमार्गाच्या खालच्या भागात म्हणजे मूत्राशय व मूत्रनलिका यामध्ये ब-याच वेळा होतो.

## कारणे-

- उत्सर्गाचे नियंत्रण करण्याची असमर्थता (लघवी करत असता नियंत्रण नसणे)
- मूत्र वहनात अडथळा, वाढलेले वृषण किंवा मूत्रमार्गात मूतखडा असणे,
- पूर्वीचे मूत्रमार्ग संसर्ग किंवा मूत्रमार्गाची शस्त्रक्रिया




## चिन्हे आणि लक्षणे -

- वारंवार लघवीस जाणे किंवा लघवीला जाण्यासाठी झोपेतून उठणे.
- लघवी करतांना जळजळ होणे, वेदना होणे
- ओटीपोटात वेदना व भार वाटणे
- लघवीस दुर्गंधी येणे
- लघवी गळणे

## निदान-

- लघवीची तपासणी केली जाते. त्यासाठी लघवीचा नमुना घेऊन तो प्रयोगशाळेत तपासला जातो . त्यामध्ये कोणत्या जंतूमुळे संसर्ग झाला आहे हे शोधले जाते.
- प्रोस्टेटला संसर्ग झाल्याची शंका असल्यास रक्त तपासणी केली जाते.
- मूत्रमार्गातील संसर्ग बरा झाला नाही किंवा तो पुन्हा उद्भावला तर इमेजिंग चाचणी केली जाते, ईमेजिंग टेस्ट मध्ये मूत्रमार्गाची चित्रे प्राप्त होतात, ज्यामध्ये संसर्ग मूत्रपिंडात आहे का हे समजते. तसेच मूत्रमार्गात काही ईजा झाली असल्यास मूत्रमार्गास अडथळा असल्यास किंवा इतर काही समस्या असल्यास समजते.

## उपचार-

- प्रतिजैविके- जीवाणूंपासून झालेला संसर्ग बरा करण्यासाठी किंवा त्यास प्रतिरोध करण्यासाठी प्रतिजैविके औषधांचा वापर केला जातो.
- लघवी करतांना होणा-या वेदना आणि जळजळ रोखण्यासाठी औषधे दिली जातात. वारंवार लघवीची भावना रोखण्यासाठी त्यांची मदत होते. त्यामुळे लघवी भगवी किंवा लाल होते.

## रुग्ण समुपदेशन-

- लघवी अडवून ठेऊ नये. जेंव्हा गरज वाटेल जेंव्हा लघवीस जावे.
- भरपूर पाणी व इतर नैसर्गिक पेये जसे ताक,लिंबू सरबत, दूध इ. प्यावी. कृत्रिम पेये (कार्बोनिटेड ड्रिंक्स) यांचा फारसा उपयोग होत नाही. (त्यामुळे लघवी होण्यास मदत होते).
- जननेंद्रियाभोवती वासाचे साबण, पावडर वापरु नये. शॉवरचा वापर करावा.

**Reference:** Micromedex’s Care Notes System Online 2.0